सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र वन विभाग

# उपवनसंरक्षक (वन्यजीव) नाशिक यांचे कार्यालय

" अरण्य संकुल " जुना आग्रारोड, त्र्यंबक नाका, नाशिक 422002
दूरध्वनी क्र. (0253) 2955114 Fax-0253-2505115
E-mail - cfwlnashik@mahaforest.gov.in


पत्र जावक.क्र. कक्ष-४/सर्व्हे/प्र.क्र.१५ / ३६२ /सन २०२४.२५ दिनांक : ११ /६/२०२४

प्रति,

मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक,
(वन्यजीव) पश्चिम मुंबई

**विषय-** Request for issuance of "Certificate and Certified Map" mentioning that the project boundary is located outside the ESZ/WLS and no Tiger/Elephant Corridor/Critical Polluted Area falls in 10 Kms of the proposed Bhavali Pumped Storage Project (1500 MW), Nashik and Thane Districts, Maharashtra.

**संदर्भ :-** १. आपलेकडील पत्र क्र. कक्ष-३/जमीन/FCA/प्र.क्र.१२०/१४३७, दि. ९/१०/२०२३
२. या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-४/सर्व्हे/प्र.क्र.१ /१०६७, दि. ३/११/२०२३
३. आपलेकडील भ्रमण ध्वनीद्वारे प्राप्त संदेशानुसार

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. १ च्या अनुषंगाने भावली पंप स्टोरेज १:५०००० प्रमाणाचे Survery of India चे टोपोशिट नकाशावर कळसूबाई हरिश्चंद्रगड अभयारण्याच्या पर्यावरण संवेदनशिल क्षेत्राच्या बाहेर असलेबाबतचे नकाशे ३ प्रतीत या कार्यालयाचे वरील संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये सोबत जोडून सविनय सादर करण्यात आलेले आहेत. संदर्भ क्र. ३ नुसार कळसूबाई हरिश्चंद्रगड अभयारण्याच्या पर्यावरण संवेदनशिल क्षेत्रापासुन १२.५० मि. दुर अंतराची समक्ष जागेवर जावुन खात्री करणेबाबत चर्चा केलेली आहे. त्यानुसार दि. ८/५/२०२४ रोजी सहा. वनसंरक्षक (वन्यजीव) कळसूबाई हरिश्चंद्रगड, वनपरिक्षेत्र अधिकारी (वन्यजीव) भंडारदरा, वनक्षेत्र सर्व्हेक्षक (वन्यजीव) नाशिक, पश्चिम भाग, नाशिक वनविभागाचे सहा. वनसंरक्षक (वन्यजीव व रोहयो), वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.) ईगतपुरी, वनसर्व्हेक्षक, पश्चिम भाग, नाशिक, वनपाल खैरगाव, वनरक्षक भावली, व वनरक्षक काळुस्ते तसेच सदर प्रकल्पाचे अधिकारी, कर्मचारी JSW Energy PSP Two Limited, यांचे समवेत जागेवर जावुन खात्री केलेली आहे.

सोबत दि. ८/५/२०२४ रोजीचा पंचनामा व फोटो सोबत जोडले आहे. सदर अहवाल माहितीसाठी सविनय सादर.

(गजेंद्र हिरे)
उप वनसंरक्षक
वन्यजीव) नाशिक

# पंचनामा

| अ.क्र. | नांव | राहणार | व्यवसाय | वय वर्षे |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. विलास म्हातू डोके | जामुंडे | शेतमजूर | २८ |
| २ | श्री. भास्कर खंडू आगिवले | जामुंडे | शेतमजूर | २९ |

आम्ही वरील नमूद गावच्या पंचलोकास सहा. वनसंरक्षक, (वन्यजीव) कळसूबाई हरिश्चंद्रगड यांनी बोलावून सांगितले की, कळसूबाई हरिश्चंद्रगड अभयारण्याच्या पर्यावरण संवेदनशील क्षेत्राला लागून पश्चिमेकडील बाजूस पश्चिम भाग, नाशिक वनविभागाचे हद्दीत भावली पंप स्टोरेज हा ईगतपूरी तालुक्यात प्रस्तावित आहे. त्यातील पर्यावरण संवेदनशील क्षेत्राची (ESZ) तपासणी करावयाची असल्यामुळे सदर ठिकाणचा पंचनामा करून द्यावा अशी विनंती केल्याने आम्ही पंचलोक पंचनामा करणेसाठी उपस्थीत आहोत.

आम्ही पंचलोक व श्री. डि. डी. पडवळे, सहा. वनसंरक्षक (वन्यजीव), श्री. अमोल आडे, वनपरिक्षेत्र अधिकारी (वन्यजीव) कळसूबाई हरिश्चंद्रगड, श्री. हि. म. खैरनार, वनक्षेत्रसर्वेक्षक (वन्यजीव) नाशिक यांनी भंडारदरा व सदर प्रकल्पाचे अधिकारी, कर्मचारी JSW Energy PSP Two Limited श्री. ललित परब AGM व श्री. विठ्ठ जाधव Dy. manager यांनी भावली पंप स्टोरेज येथील पश्चिमेकडील प्रकल्पाच्या हद्दीच्या खुणा जागेवर D.GPS द्वारे निश्चीत केलेल्या आहेत. सदर हद्दीची खात्री कळसूबाई हरिश्चंद्र गड अभयारण्य क्षेत्रातील पर्यावरण संवेदनशील (ESZ) च्या अधिसुचनेतील Longitude व Latitude नुसार GPS द्वारे केली आहे. सदर GPS Reading N 19° 36′ 13.35″, E 73° 36′ 0.44″ घेण्यात आलेले आहे.

सदर पश्चिमेकडील बाजूस पश्चिम भाग, नाशिक वनविभागाचे क्षेत्रात प्रकल्प हद्दीच्या खुणा जागेवर प्रकल्प यंत्रणेने खुणा करून ठेवलेल्या होत्या. सदर क्षेत्राची खात्री श्री. अनिल पवार, सहा. वनसंरक्षक (वन्यजीव व रोहयो) नाशिक श्री. केतन बिरारीस, वनपरिक्षेत्र अधिकारी ईगतपूरी (प्रा.) श्री. दिपक गावीत, वनसर्वेक्षक पश्चिम भाग, नाशिक श्री. पि. के. डांगे वनपाल खैरगांव श्री. व्हि. पी. गायकवाड, वनरक्षक भावली श्रीमती एम. बी. घादवड, वनरक्षक काळुस्ते सर्व ईगतपूरी वनक्षेत्र सदर प्रकल्प क्षेत्राच्या हद्दीवरील चिन्हांकीत केलेले GPS Reading N 19° 36′ 13.55″, E 73° 36′ 0.45″ घेण्यात आलेले आहे.

सदर हद्दी खुणा केलेल्या पर्यावरण संवेदनशील (ESZ) क्षेत्राची तपासणी वन्यजीव विभागाकडील अधिकारी व कर्मचारी तसेच पश्चिम भाग, नाशिक वन विभागाचे कार्यक्षेत्रातील भावली पंप स्टोरेज जागेवर प्रकल्प यंत्रणेने केलेल्या हद्दी खुणा नुसार तसेच प्रत्यक्ष खात्री केलेली आहे. नुसार संबधीत अधिकारी व कर्मचारी यांनी सदर दोन्ही क्षेत्रामधील अंतराची मोजणी पश्चिम भाग, नाशिक व वन्यजीव विभाग, नाशिक येथील अधिकारी कर्मचारी यांनी

सदर क्षेत्रामधील अंतराची मोजणी टेपने केली असता
सदर अंतर हे 12.50 मीटर भरले आहे.

सदर भावली पंप स्टोरेज यांचे अधिकारी, कर्मचारी यांनी
पर्यावरण संवेदनशील (ESZ) क्षेत्रालगत जागेवर हद्दी-चुना केलेल्या
क्षेत्राच्या वर पाणी अथवा कुठल्याही प्रकारचे खोदकाम करताना
नाही या बाबत आमच्या पंचासमक्ष काही दिसले आहे

सदरचा पंचनामा सकाळी १०.०० वा. सुरु करुन दि. १२.०४
संपविलेला आहे.

पंचनामा लिहून वाचून सही/अंगठे करीत आहोत.

जामुंडे, दि. ८.५.२०२४

पंच

समक्ष

१) [signature]

२) भास्कर आगिवले

[signature]
सहाय्यक वनसंरक्षक
कळसूबाई हरिश्चंद्रगड अभयारण्य
नाशिक
8/05/2024

[signature] 8/5/24
ACF (F&W)
West Nashik

[signature]
वनक्षेत्र सहाय्यक
(वन्यजीव) नाशिक

[signature]
वनपरिक्षेत्र अधिकारी
इगतपुरी (प्रा.)

[signature]
वनसर्वेक्षक
(पश्चिम भाग नाशिक)

[signature]
वनपाल [illegible]गाव

[signature]
व.र. भावली

[signature]
व.र. [illegible]

[signature]
Lalit Pawar

[signature]
Lahu Jadhav

JSW Energy PSP Two Limited.















